**बृहन्मुंबई महानगरपालिका**
लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व
वैद्यकीय महाविद्यालय शीव, मुंबई – 400 022.
**परिचारीका आस्थापना विभाग**

**लोटिरु/5263/परि. अस्थापना दि. 03.06.2024.**

**सामान्य परिचर्या व प्रसुतीशास्त्र अभ्यासक्रम (3 वर्षे) फक्त महिला उमेदवारांकरीता जाहिरात**

दिनांक 01.08.2024 पासून खालील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परिचर्या प्रशिक्षण संस्थांमध्ये सुरु होणा-या सामान्य परचर्या व प्रसुतीशास्त्र अभ्यासक्रमाकरीता प्रशिक्षण घेऊ इच्छिणा-या महिला उमेदवारांकडून मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर संगणकीय (ऑनलाईन) पध्दतीने विहीत प्रपत्रांमध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत. http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन सेवा या सदरामध्ये GNM NURSING ADMISSION या शीर्षकाखाली प्रवेश प्रक्रीयेविषयी माहिती व वेळापत्रक दिनांक 05.06.2024 पासून उपलब्ध करुन देण्यात येईल यांची नोंद घ्यावी. ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत दि.07.06.2024 ते दि. 20.06.2024.

1. रा.ए.स्मा.रुग्णालय, परेल, मुंबई – 400 012
2. लो.टि.म.स.रुग्णालय, सायन, मुंबई – 400 022
3. बा.य.ल.नायर धर्मा रुग्णालय, मुंबई सेंट्रल, मुंबई – 400 008
4. डॉ.आर.एन.कूपर रुग्णालय, विलेपार्ले, मुंबई – 400 049
5. श्री हरिलाल भगवती रुग्णालय, बोरीवली (पश्चिम), मुंबई – 400 103

निवड झालेल्या उमेदवारांना सामान्य परिचर्या व प्रसतिशास्त्र अभ्यासक्रमासोबत सार्वजनिक आरोग्य परिचर्या आणि प्रसुतीशास्त्र आंतरवासियतासहीत 3 वर्षे अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण घ्यावे लागेल.( अभ्यासक्रमाचा कालावधी व अभ्यासक्रमाचे विषय भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांच्या ठरावासापेक्ष)

स्त्री उमेदवारांनी रुग्णालयांशी संलग्न असलेल्या निवासस्थानामध्ये (वसतीगृहामध्ये) रहाणे अनिवार्य आहे.

विद्यावेतन – दरमहा रु.100-10-120 अधिक रु.340/- गणवेश भत्ता अधिक रु.150/- धुलाई भत्ता अधिक मोफत वसतीगृह निवासस्थान व मोफत भोजन या व्यवस्था आहेत.

**अर्हता :-**

1. उमेदवार महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाची उच्च माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (10+2) अथवा समतुल्य परीक्षा शासनमान्य संस्थेतून प्राधान्याने जीवशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र (BIOLOGY, CHEMISTERY, PHYSICS) या शास्त्र विषयासह (पी.सी.बी.) कमीत कमी 40 टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे आवश्यक पात्रता धारण करणारे उमेदवार पुरेशा संख्येने

उपलब्ध झाले नाहीत तर महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाची कोणत्याही शाखेतील आणि कोणत्याही विषयातील उच्च माध्यमिक परिक्षा (10+2) कमीत कमी 40% गुणांनी उत्तीर्ण करणा-या खुला गटातील उमेदवारांचा व कमीत कमी 35 % गुणांनी उत्तीर्ण होणा-या मागासवर्गीय गटातील उमेदवारांचा प्रवेशासाठी विचार करण्यात येईल.

2. या अभ्यासक्रमासाठी उपलब्ध असलेल्या जागांतून सहाय्यकारी परिचारीका प्रसविका अभ्यासक्रम (AUXILLIARY NURSE MIDWIFERY) सुधारीत अभ्यासक्रम उत्तीर्ण असलेल्या महाराष्ट्र परिचर्या परिषद व महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ (MAHARASHTRA STATE OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION RECOGINIZED) महिला उमेदवारांसाठी 5 टक्के जागा राखीव असतील, मात्र असे उमेदवार आवश्यक अर्हता (10+2) धारण करीत असावेत व या अभ्यासक्रमाबाबतच्या अन्य अटींची पूर्तता करीत असावेत. तथापि विहीत केलेल्या प्रपत्रात प्रतिज्ञापत्र सादर करण्यासापेक्ष जे उमेदवार कोठेही नोकरीला नसतील त्यांना विद्यावेतन अनुज्ञेय राहील. या जागांकरीता जर असे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर सदर जागेत उर्वरित जागां मिळविण्यात येतील.
3. अपंगांसाठी 5 टक्के जागा आरक्षित राहतील या जागांवर उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या त्या प्रवर्गातील उमेदवारांमधून निवड करण्यात येईल.
4. उमेदवार दहावी (10वी) व बारावी (12वी) इयत्ता परीक्षा महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळ, उच्च माध्यमिक अथवा समतुल्य शिक्षण मंडळातून उत्तीर्ण झालेली असली पाहिजे.
5. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम उच्च परीक्षा किमान 50 गुणांचा मराठी विषय घेऊन (उच्च स्तर/ निम्न स्तर) उत्तीर्ण झालेली असली पाहिजे. मराठी भाषा सुलभतेने लिहिता, वाचता व बोलता आली पाहिजे.
6. पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे.

**<u>वयोमर्यादा :-</u>**

दिनांक 31.07.2024 रोजी 17 ते 35 वर्ष

उमेदवारांचा जन्मदिनांक दिनांक 01.08.1989 पासून दिनांक 31.07.2007 पर्यंत असल्यास प्रवेशास पात्र समजले जाईल.

**<u>समुपदेशन :-</u>**

समुपदेशनासाठी निवड झालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने मुळ प्रमाणपत्रे ऑनलाईन अर्जाची प्रत,  अर्ज शुल्क पावती सहीत हजर रहावे लागेल. समुपदेशन करीता पात्र उमेदवारांची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाहीर केली जाईल व समुपदेशनासाठी हजर राहणेकरीता उमेदवारांना कुठलाही वैयक्तिक पत्रव्यवहार केला जाणार नाही. समुपदेशन लो.टि.म.स. रुग्णालय, शीव, मुंबई – 400 022, परिचर्या पाठ्यशाळा येथे घेण्यात येईल.

**<u>सेवेच्या अटी :-</u>**

निवड झालेल्या उमेदवारांना महानगरपालिका कर्मचा-यांची वर्तणूक व शिस्तविषयक नियम व विद्यार्थी परिचारीकांसाठी घालून दिलेले नियम व  अधिनियम यांचे बंधन राहील. उमेदवारांना एकदा

प्रवेश घेतल्यानंतर मध्येच अभ्यासक्रम सोडून जाता येणार नाही. अन्यथा रु.10747/- इतका दंड आकारण्यात येईल.

1) विद्यार्थी परिचारीका प्रवेशासाठी एकूण संख्या 350

ब) शासन नियमाप्रमाणे सामाजिक आरक्षण खालीलप्रमाणे आहे :-

| प्रवर्ग | अ.जा | अ.ज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | इडब्लूएस | एसईबीसी | खुला प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आरक्षण | 13% | 7% | 3% | 2.5% | 3.5% | 2% | 2% | 19% | 10% | 10% | 28% |
| आरक्षीत जागा | 45 | 24 | 11 | 9 | 12 | 7 | 7 | 67 | 35 | 35 | 98 |

शासन निर्देशानुसार 1) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र 2) अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती प्रवर्ग वगळता मागासवर्गातील उमेदवारांनी [विमुक्त जाती(अ), भटक्या जमाती(ब), भटक्या जमाती(क), भटक्या जमाती(ड), विशेष मागासवर्ग प्रवर्ग, इतर मागासवर्ग प्रवर्ग, आर्थिक दृष्टया दुर्बल (E.W.S.), **SEBC**] तो उन्नत व प्रगत गटात समाविष्ट होत नाही असा उल्लेख असलेले सक्षम प्राधिका-यांनी दिलेले अगदी अलीकडील प्रमाणपत्र (नॉन - क्रिमीलेअर) सादर करणे आवश्यक आहे.

विजा(अ), भज(ब), भज(क) व भज(ड) या प्रवर्गासाठी विहीत केलेले आरक्षण हे अंतर्गत परिवर्तनीय राहील. जर मागासवर्गीयांच्या कोणत्याही प्रवर्गातील राखीव जागा रिक्त राहिल्यास त्या उर्वरित मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. **तसेच ONLINE अर्जाची किंमत खुल्या प्रवर्गासाठी रु.560/- + जीएसटी 18% (एकुण रु.661/-) सर्वकरांसहीत (CGST-9% & SGST 9%) आणि मागासवर्गीयांसाठी रु.374/- + जीएसटी 18% (एकूण रु.441/-) सर्वकरांसहीत (CGST-9% & SGST 9%) आकारण्यात येईल. ऑनलाईन पध्दतीने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे आणि वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करत अर्ज परिपूर्णरित्या सादर करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. प्रवेशप्रक्रियेसंदर्भात महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर मार्गदर्शक पुस्तिका उपलब्ध करुन देण्यात आली आहे.**

**विशेष नोंद :-** भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाच्या (MAHARASHTRA STATE BOARED OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION) ठरावानुसार सदर पदविका अभ्यासक्रम प्रशिक्षण कालावधी तसेच अभ्यासक्रमातील विषय बदलण्याची शक्यता आहे याची नोंद घ्यावी. जर एखादया उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुसूचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

**-SD-**
**अधिष्ठाता**
लो. टि. म. स रुग्णालय